**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' दि.११.०६.२००८ रोजी पुणे येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात खालील अपीलाचा समावेश होता :

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २४८ / पुणे | उपस्थिती |
| २ | अपीलकर्ता | श्री. विष्णू दत्तात्रय काळे,<br>२१, शनिवार पेठ, डोळस आळी,<br>कन्याशाळेसमोर, तळेगाव दाभाडे, जि. पुणे | गैरहजर |
| ३ | जन माहिती अधिकारी | सहायक जिल्हा पुरवठा अधिकारी, पुणे,<br>जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे | हजर |
| ४ | अपिलीय प्राधिकारी | अप्पर जिल्हाधिकारी, पुणे | हजर |

अपीलकर्त्यांने दि. १.४.१९७६ ते ३०.११.१९७७ या कालावधीतील वेतन निश्चितीची फरकाची रक्कम मिळण्याबाबत, तसेच भविष्य निर्वाह निधी ऊर्वरित रक्कम मिळण्याबाबत अर्ज केला होता

सदरची बाब माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कक्षेत येत नाही. तथापि यासंदर्भात कार्यवाही सुरू असल्याचेही जन माहिती अधिकारी यांनी निदर्शनास आणून दिले आहे.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

पुणे
दि. ३०.६.२००८

राज्य माहिती आयोग पुणे खंडपीठ

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

११.६.०८

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौंसिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.संभाजी पांडुरंग भोसले
मु.पो.जाखले, ता.पन्हाळा, जि.कोल्हापूर — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा सचीव, श्री गोपाळेश्वर शिक्षण प्रसारक मंडळ,
जाखले, ता.पन्हाळा, जि.कोल्हापूर — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा मुख्याध्यापक, जाखले हायसकूल,
जाखले, ता.पन्हाळा, जि.कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २४९ / कोल्हापूर /२००६ |
| २ | (विशेष अपील निर्गत मोहीम) | दि.१३.५.२००८ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.संभाजी पांडुरंग भोसले
मु.पो.जाखले, ता.पन्हाळा, जि.कोल्हापूर

**जन माहिती अधिकारी** तथा मुख्याध्यापक, जाखले हायस्कूल,
जाखले, ता.पन्हाळा, जि.कोल्हापूर श्री.आनंदा बापूसाहेब नाईक

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ८.९.२००६ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ५.१०.२००६ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. -- |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. |

| | |
|---|---|
| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**<br><br>दि.१३.६.१९८६ ते ३१.५.२००६ अखेर मूळ सेवापुस्तिकेवरुन सर्व नोंदी सोबत दिलेल्या सेवापुस्तिकेमध्ये पूर्ण भरुन मिळावे |

## विवेचन

मूळ सेवापुस्तिकेवरुन दि.१३.६.१९८६ ते ३१.५.२००६ अखेरपर्यंतच्या सर्व नोंदी आपण सोबत दिलेल्या सेवापुस्तिकेमध्ये भरुन देण्याची मागणी श्री.संभाजी पांडुरंग भोसले यांनी जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, जाखले हायस्कूल, जाखले, ता.पन्हाळा, जि.कोल्हापूर यांच्याकडे केली होती. 'आपण प्रभारी मुख्याध्यापक म्हणून पदभार सोडल्यानंतर शालेय दप्तरामध्ये तुमचे मूळ सेवापुस्तक आढळून आले नाही', असे जन माहिती अधिकाऱ्यांनी त्यांना कळविले. श्री.भोसले यांनी माहिती अधिकारी तथा सचीव, श्री गोपाळेश्वर शिक्षण प्रसारक मंडळ, जाखले, ता.पन्हाळा, जिल्हा कोल्हापूर यांच्याकडेही या स्वरुपाचा अर्ज केला. श्री.भोसले यांनी दोन्ही अर्ज माहितीच्या मागणीचे म्हणून जन माहिती अधिकारी यांच्याकडे केले होते, परंतु सचिवांनी आपल्या अपिलाची दखल घेतली नाही, असे नमूद करुन त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे. महाराष्ट्र माहितीचा अधिकार अधिनियम २००२ अन्वये दोन्ही अर्ज केले असूनही आयोगाने हे अपील दाखल करुन घेतले.

कोल्हापूर येथील विशेष अपील निर्गत कार्यक्रमात दि.१३.५.२००८ रोजी या अपिलाचा समावेश करण्यात आला होता. परंतु यामध्ये एकमत न झाल्यामुळे नमुनापत्रात नमूद केलेल्या माहितीच्या व उभय बाजूंनी सादर केलेल्या कागदपत्रांच्या आधारे निर्णय घेण्यात आला.

आपले म्हणणे सादर करण्यासाठी मुदत मिळण्याची मागणी स्वतःच्या व सचिवांच्या वतीने माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक यांनी पत्राद्वारे विशेष अपील निर्गत कार्यक्रमाच्या दिवशी केली. (दि.१३.५.२००८ ला सादर केलेल्या या पत्रावर तारीख मात्र १३.८.२००८ अशी आहे.) मूळ अर्ज दि.८.९.२००६ व दि.२१.९.२००७ या दिनांकाचे आयोगाकडे अपील दि.६.११.२००७ रोजी

केले आहे. दरम्यानच्या कालावधीत मुख्याध्यापक व अपिलीय प्राधिकारी म्हणणे सादर करु शकले असते. आयोगाने सुनावणी निश्चित केल्यावर मुदत मागणे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या अंमलबजावणीबाबत गांभीर्य नसल्याचे निदर्शक आहे.

आपण दिलेले सेवापुस्तिका मूळ सेवापुस्तिकेवरुन भरुन द्यावी, ही मागणी प्रशासकीय कार्यवाहीची असून या मागणीचा विचार माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कक्षेत करता येणार नाही. मात्र सेवापुस्तिकेतील नोंदीची प्रत अपीलकर्त्यास मिळणे आवश्यक आहे. मूळ सेवापुस्तक उपलब्ध करुन जन माहिती अधिकाऱ्यांनी त्याची प्रत अपीलकर्त्यास दिली पाहिजे.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

(१) अपील अमान्य.

(२) अपीलकर्त्याचे मूळ सेवापुस्तक उपलब्ध करुन त्याची प्रत अथवा योग्य त्या नोंदी असलेली प्रत अपीलकर्त्यास हा आदेश मिळाल्यापासून १५ दिवसात जन माहिती अधिकाऱ्यांनी निःशुल्क द्यावी. याबाबतचा पूर्तता अहवाल आयोगाला सादर करावा. ही जबाबदारी जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांची राहील.

(विजय कुंवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि.६.६.२००८

julyo८-३-५

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' दि. १३.५.२००८ रोजी कोल्हापूर येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात खालील अपिलाचा समावेश होता :

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २५६ / कोल्हापूर |
| २ | अपीलकर्ता | श्री. दत्तात्रय रामचंद्र माने<br>द्वारा जनसेवा कुरूंदवाड, जि. कोल्हापूर |
| ३ | जन माहिती अधिकारी | मुख्याधिकारी, कुरूंदवाड नगरपरिषद, कुरूंदवाड, जि. कोल्हापूर |
| ४ | अपिलीय प्राधिकारी | उप आयुक्त, सामान्य प्रशासन, पुणे विभाग, पुणे |

कुरूंदवाड नगर परिषद हद्दीतील सि.स.क्र.३१८३/३ बाबतची माहिती अपीलकर्त्याने मागितली होती. याबाबत तीन घटकांमध्ये झालेल्या चर्चेनुसार अपीलकर्त्याने मागितलेली माहिती त्यांना प्राप्त झालेली असल्याने अपील निकाली काढण्यास मान्यता दिली आहे.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

पुणे
दि. २० .६.२००८

(राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र, पुणे खंडपीठ — शिक्का)

**( विजय कुंवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' दि.१७.०६.२००८ रोजी सोलापूर येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात खालील अपीलांचा समावेश होता :

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २५८/ सोलापूर | उपस्थिती |
| २ | अपीलकर्ता | श्री. सतिश बाबुराव भगत .<br>मु.पो.आझाद चौक अकलूज<br>ता . माळशिरस , जि. सोलापूर | हजर |
| ३ | जन माहिती अधिकारी | अपर चिटणीस (कुळकायदा)<br>जिल्हाधिकारी कार्यालय, सोलापूर . | हजर |
| ४ | अपिलीय प्राधिकारी | निवासी उप जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, सोलापूर | हजर |

टेनन्सी केस नं.१०/९९ जिल्हाधिकारी यांचे पूर्व परवानगीशिवाय जमिनीचे कोणतेही व्यवहार करू नये, या आदेशानुसार सरेंडरच्या पूर्व परवानगीसाठी कोणती कागदपत्रे आवश्यक आहेत व त्याबाबत कालमर्यादा किती दिवसाची आहे, याची माहिती जन माहिती अधिकारी तथा अपर चिटणीस (कुळकायदा), जिल्हाधिकारी कार्यालय, सोलापूर यांच्याकडे अपीलकर्त्याने मागितली होती. देय माहिती अपीलकर्त्यास १० दिवसात देण्याचे वरील घटकांमधील चर्चेत ठरले. जमीन सरेंडर करण्यास परवानगी मिळून तसा हुकूम व्हावा, अशी अपीलकर्त्याची मुख्य मागणी आहे. ती माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कक्षेत येत नाही. मात्र संबंधित प्रकरण जिल्हाधिकारी यांच्याकडे निर्णयासाठी पाठविण्याचे जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी मान्य केले .

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. देय माहिती अपीलकर्त्यास १० दिवसांत व नि:शुल्क देऊन तसा पूर्तता अहवाल अपिलीय प्राधिकारी यांनी आयोगाला सादर करावा.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र, पुणे खंडपीठ

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

पुणे
दि. ३०.०६.२००८

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' दि.११.०६.२००८ रोजी पुणे येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात खालील अपीलाचा समावेश होता :

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २५९/ पुणे | उपस्थिती |
| २ | अपीलकर्ता | श्री. माणिक विश्वनाथ वाळेकर,<br>ओतूर ढमाळे मळा, ता. जून्नर, जि.पुणे | गैरहजर |
| ३ | जन माहिती अधिकारी | चिटणीस, जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे जि. पुणे | हजर |
| ४ | अपिलीय प्राधिकारी | निवासी उप जिल्हाधिकारी पुणे, जि. पुणे | हजर |

वरील कार्यक्रमास अपीलकर्ता गैरहजर होते. जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी सर्व कागदपत्रांसह अपीलकर्त्यास मुदतीत प्रकरणांची सद्यस्थिती / वस्तुस्थितीबाबत माहिती दिल्याचे प्रतिपादन केले.

अपीलकर्त्याने उपविभागीय अधिकाऱ्यांच्या अन्यायकारक निकालाबाबत केलेल्या तक्रार अर्जाच्या चौकशीबाबत माहिती मागितली होती. तसेच त्यांची चौकशी होऊन त्यांच्या विरूध्द कारवाईची मागणी केली होती. जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांची निवेदने, तसेच आयोगाला सादर करण्यात आलेली कागदपत्रे लक्षात घेता असे निदर्शनास येते की, अपीलकर्त्याची मागणी ही अधिकाऱ्याविरूध्दच्या तक्रारीची चौकशी होण्याची आहे. चौकशीची कार्यवाही सुरू असल्याबाबत जन माहिती अधिकारी यांनी त्यांना सविस्तर पत्रोत्तरे दिली आहेत. तसेच अन्यायकारक वाटत असलेल्या निर्णयावर अपीलकर्त्याने योग्य त्या न्यायालयात दाद मागावी, असेही उपविभागीय अधिकारी, जुन्नर यांनी पत्रान्वये कळविले आहे. अपीलकर्त्याची मागणी ही माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कक्षेत येत नाही.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

पुणे
दि. २७.६.२००८

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र, पुणे खंडपीठ

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, (पुणे विभाग) यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री. विलास गणपती भांबुरे
रा. मिरज, शासकीय निवासस्थान संकुल,
सावळी रोड, मिरज, जि. सांगली

अपीलकर्ता

विरुध्द

अपिलीय प्राधिकारी तथा
निवासी उपजिल्हाधिकारी, सांगली, जि. सांगली

उत्तरवादी

जन माहिती अधिकारी तथा
चिटणीस, जिल्हाधिकारी कार्यालय, सांगली

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २६० / सांगली |
| २ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ३०.१२.२००६ |
| ३ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ८.१.२००७ |
| ४ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २४.१.२००७ |
| ५ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २८.२.२००७ |

६ **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**

सेवा श्रेणीप्रमाणे १२ वर्षांची कालबध्द वेतनश्रेणी मिळणेबाबत

## विवेचन

अपीलकर्ता श्री. विलास गणपती भांबुरे यांनी सेवाश्रेणीप्रमाणे १२ वर्षांची कालबध्द वेतनश्रेणी मिळण्याबाबतची मागणी जन माहिती अधिकारी तथा चिटणीस, जिल्हाधिकारी कार्यालय, सांगली यांच्याकडे केली होती. बारा वर्षांच्या वेतनश्रेणीबाबत आदेश झाला नसल्याने तो देता येत नसल्याचे

जन माहिती अधिकाऱ्यांनी कळविले. जन माहिती अधिका-यांनी दिलेल्या उत्तराने समाधान न झाल्याने अपीलकर्त्याने अपिलीय प्राधिकारी तथा निवासी उपजिल्हाधिकारी, सांगली यांच्याकडे अपील केले. अपीलकर्त्याची मागणी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कक्षेत येत नसल्याबाबत दि. २८.२.२००७ रोजी अपिलीय प्राधिका-यांनी निर्णय दिलेला आहे. हा निर्णय योग्य असून अपिलीय प्राधिकारी यांचे निर्णयात बदल करण्याची आवश्यकता नाही.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**पुणे**
**दि.१६ .६.२००८**

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र * पुणे खंडपीठ *

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.** 108

2

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौंसिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

सौ.प्रतिभा प्र.तायशेटे
ग्राहक पंचायत राधानगरी,
ता.राधानगरी, जि.कोल्हापूर-४१६२१२ अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा आरोग्य उपसंचालक,
आरोग्य सेवा, कोल्हापूर मंडळ, कोल्हापूर उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा जिल्हा शल्य चिकित्सक,
सामान्य रुग्णालय, कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २६२ / कोल्हापूर /२००७ |
| २ | सुनावणीची तारीख(विशेष अपील निर्गत मोहीम) | दि. १३.५.२००८ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** सौ.प्रतिभा प्र.तायशेटे
ग्राहक पंचायत राधानगरी,
ता.राधानगरी, जि.कोल्हापूर-४१६२१२

**अपिलीय प्राधिकारी** तथा आरोग्य उपसंचालक,
आरोग्य सेवा, कोल्हापूर मंडळ, कोल्हापूर डॉ.सी.जे.भोंडे

**जन माहिती अधिकारी** तथा जिल्हा शल्य चिकित्सक,
सामान्य रुग्णालय, कोल्हापूर डॉ.व्ही.बी.यादव

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १८.५.२००७ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ३१.५.२००७ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. ४.७.२००७ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. १०.८.२००७ |

| मूळ अर्जात मागणी केलेली माहिती |
| --- |
| ग्रामीण रुग्णालयामार्फत रुग्णांना व जनतेस कोणकोणत्या सुविधा पुरविलेल्या आहेत व ग्रामीण रुग्णालय, राधानगरी यांचेमार्फत कोणकोणत्या सेवा पेशंटला दिल्या जातात याची माहिती |

## विवेचन

ग्रामीण रुग्णालयांमार्फत पुरविल्या जाणाऱ्या सेवासुविधांच्या बाबतची व राधानगरीतील ग्रामीण रुग्णालयाविषयी माहिती अपीलकर्त्या सौ.प्रतिभा प्र.तायशेटे यांनी मागितली होती. जन माहिती अधिकाऱ्यांनी दिलेली माहिती अपुरी असल्याच्या, तसेच अपिलीय प्राधिकाऱ्यांचे नाव व हुद्दा कळविले नसल्याच्या कारणावरुन सौ.तायशेटे यांनी अपिलीय प्राधिकारी तथा आरोग्य उपसंचालक, आरोग्य सेवा, कोल्हापूर मंडळ, जिल्हा कोल्हापूर यांच्याकडे अपील केले. अपिलानंतरही माहिती मिळाली नाही, म्हणून शास्तीच्या मागणीसाठी सौ.तायशेटे यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

कोल्हापूर येथील विशेष अपील निर्गत कार्यक्रमात दि.१३.५.२००८ रोजी या अपिलांचा समावेश करण्यात आला होता. परंतु यामध्ये एकमत न झाल्यामुळे नमुनापत्रात नमूद केलेल्या माहितीच्या व उभय बाजूंनी सादर केलेल्या कागदपत्रांच्या आधारे निर्णय घेण्यात आला.

सौ.तायशेटे यांनी मागितलेल्या सात मुद्दयांपैकी मुद्दा क्र.४ ची - कोणकोणत्या विकारांवर इलाज होणार व ग्रामीण रुग्णालय, राधानगरी मार्फत प्रत्यक्ष कोणकोणत्या सुविधा रुग्णांना दिल्या जातात, ही माहिती जन माहिती अधिकारी यांनी दिली नाही. असे सौ.तायशेटे यांनी आयोगाकडे केलेल्या अपिलात नमूद केले आहे. परिपूर्ण माहिती देण्याचे आदेश अपिलीय प्राधिकाऱ्यांनी देऊनही माहिती मिळाली नसल्याचे त्यांनी नमूद केले आहे. ग्रामीण रुग्णालय, राधानगरीकडील गरीब रुग्णांना पूर्ण क्षमतेने आरोग्य सेवा मिळण्यासाठी प्रक्रिया राबविण्याची आपली योजना होती, असे सौ.तायशेटे यांनी आयोगाला सादर केलेल्या लेखी निवेदनात म्हटले आहे. तसेच दि.१२.५.२००८ रोजी ( म्हणजे जवळजवळ वर्षाने ) ऊर्वरित माहिती मिळालेली आहे, असे विशेष अपील निर्गत कार्यक्रमाच्या नमुनापत्रात उभय बाजूंनी नमूद केले आहे. 'सदर ग्रामीण रुग्णालय पूर्ण क्षमतेने

कार्यान्वित नसल्याने सध्या आपत्कालीन रुग्ण सेवा व बाह्य रुग्णसेवा कार्यान्वित आहे. ही माहिती देण्यात आली आहे' असे जन माहिती अधिकाऱ्यांनी नमूद केले आहे.

उभय बाजूंनी सादर केलेली कागदपत्रे पाहता जन माहिती अधिकारी श्री.व्ही.बी.यादव यांनी एक मुद्दा वगळता सर्व माहिती दिली आहे, व हेतुतः माहिती नाकारल्याचे दिसत नाही, मात्र परिपूर्णतेने व तत्परतेने माहिती देण्याबाबत त्यांनी अधिक दक्षता घेणे आवश्यक होते. विलंब क्षमापित करण्याची त्यांची विनंती मान्य करण्यात येत आहे.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

(१) अपील निकाली काढण्यात येत आहे.

(२) शास्ती नाही. मात्र देय माहिती विहित मुदतीत परिपूर्णतेने देण्याबाबत जन माहिती अधिकारी तथा जिल्हा शल्य चिकित्सक, सामान्य रुग्णालय कोल्हापूर श्री.व्ही.बी.यादव यांना समज देण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि.५.६.२००८

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' दि. १३.५.२००८ रोजी कोल्हापूर येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात खालील अपिलाचा समावेश होता :

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २९ / सातारा |
| २ | अपीलकर्ता | श्री. दिपक बाळासाहेब शिर्के<br>रा. नवीन मार्केट यार्ड शेजारी, यशवंतनगर,<br>वाई, ता. वाई, जि. सातारा |
| ३ | जन माहिती अधिकारी | सहाय्यक संचालक, नगररचना, सातारा, जि. सातारा |
| ४ | अपिलीय प्राधिकारी | उप संचालक, नगररचना, सातारा, जि. सातारा |
| ५ | मूळ अर्जात मागणी केलेली माहिती | विकास आराखड्यातील केलेल्या बदलाबद्दल, वाई शहराच्या मंजूर विकास योजनाबाबत व तद्‌अनुषंगाने माहिती |

शासकीय माहिती अधिकारी तथा सहाय्यक संचालक, नगररचना, सातारा यांनी त्यांचे कार्यालयामधील अभिलेखात उपलब्ध असणाऱ्या माहितीनुसार माहिती पुरविली असल्याने चुकीची माहिती दिली हे अपीलकर्त्याचे म्हणणे योग्य व संयुक्तिक वाटत नाही, असे अपिलीय प्राधिकारी यांनी नमूद केले आहे. तसेच अपीलकर्त्याची स.क्र. १/७ब मधील नियोजित रस्त्याच्या रेखांकनाची तक्रार ही माहितीच्या अधिकारात येत नसून त्यासाठी महसूल अथवा नगरविकास विभागाकडे तक्रार अर्ज करू शकतात, असे अपीलकर्त्यास स्पष्ट केल्याचे जन माहिती अधिकारी, अपिलीय प्राधिकारी यांनी नमूद केले आहे.

अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांचे म्हणणे विचारात घेता, कागदपत्रांमधील नोंद दुरूस्त करणे हा प्रशासकीय कार्यवाहीचा विषय असून माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कक्षेत येत नाही.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. विकास आराखड्यातील रचनेमध्ये बदल करण्याचे अधिकार नगररचना, सातारा या कार्यालयास आहेत की नाही, याची माहिती जन माहिती अधिकाऱ्यांनी दिलेली नाही, ती अपीलकर्त्यास आठ दिवसांत निःशुल्क द्यावी व त्याबाबतचा पूर्तता अहवाल आयोगास सादर करावा.

**पुणे**
**दि.** ६ .६.२००८

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र, पुणे खंडपीठ

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**